# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 26.03.2024** **वारः मंगळवार**

---

१.परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी घेतली सिंगापूरचे पंतप्रधान ली सिएन लूंग यांची भेट
२.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशभरात राजकीय घडामोडींना वेग
३.देशभरात होळी आणि धूलिवंदनाचा सण अत्यंत उत्साहात साजरा
४.येत्या जुलै ते सप्टेंबर दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यवृष्टीचा आशिया प्रशांत आर्थिक सहकार्य हवामान केंद्राचा अंदाज

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस.जयशंकर यांनी काल सिंगापूरचे पंतप्रधान ली सिएन लूंग यांची भेट घेतली. सिंगापूरच्या पंतप्रधानांच्या भारताबद्दलच्या सकारात्मक भावना परस्पर संबंधांना नेहमीच बळकटी देत आहेत असं डॉक्टर जयशंकर यांनी समाज माध्यमावरील एका संदेशात म्हटलं आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीबाबत सिंगापूरच्या पंतप्रधानांच्या दृष्टीकोनाचा भारताला आदर आहे असंही जयशंकर यांनी सांगितलं. तीन दिवसांच्या सिंगापूर दौऱ्यावर असलेल्या जयशंकर यांनी सिंगापूरचे परराष्ट्र व्यवहार मंत्री विवियन बालकृष्णन यांचीही भेट घेतली. या बैठकीत त्यांनी भारत आणि सिंगापूर यांच्यातील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला, तसंच हिंद प्रशांत क्षेत्र आणि पश्चिम आशियासंदर्भातही चर्चा केली.

**<u>लोकसभा निवडणूक</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशभरात आता राजकीय घडामोडीनी वेग घेतला आहे. देशात सात टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज प्रक्रिया सुरू असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख २७ मार्च आहे तर 28 तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. या जागांसाठी येत्या १९ एप्रिलला मतदान होणार आहे. उत्तरप्रदेशात या निवडणुकीत आरएलडी भाजपसोबत आहे, तर सपा आणि काँग्रेस एकत्र निवडणूक लढवत आहेत. बसपानं स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे.

कर्नाटकमध्ये, KRPP चे नेते जी जनार्दन रेड्डी यांनी काल आपला पक्ष भारतीय जनता पार्टीमध्ये विलीन केला आणि लोकसभा निवडणुकीपूर्वी पत्नी अरुणा लक्ष्मीसह भाजपामध्ये प्रवेश केला.

दरम्यान विविध पक्ष आपापल्या उमेदवारांची घोषणा करत आहेत. काँग्रेसनं लोकसभा निवडणुकीसाठी पाच उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. प्रल्हाद गुंजाळ कोटामधून, रामचंद्र चौधरी अजमेरमधून आणि सुदर्शन रावत राजस्थानमधल्या राजसमंद मतदारसंघातून तर तामिळनाडूतल्या तिरुनेलवेली इथून एडव्होकेट सी.रॉबर्ट ब्रूस निवडणूक लढवणार आहेत.

तेलंगणमध्ये, भारत राष्ट्र समिती (BRS) पक्षानं, सर्व 17 लोकसभा मतदारसंघांसाठी काल आपले उमेदवार जाहीर केले. बिहारमध्ये, गया, नवादा, औरंगाबाद आणि जमुई लोकसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारांच्या उमेदवारी अर्ज प्रक्रियेला वेग आला आहे.

महाराष्ट्रात नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघात पहिल्या टप्प्यामध्ये निवडणूक होणार असून, इथल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसनं चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी दिली आहे. या मतदार संघात भाजपनं सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान, नागपूर लोकसभा मतदारसंघातले काँग्रेसचे उमेदवार आमदार विकास ठाकरे आपला उमेदवारी अर्ज आज जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करणार आहेत तर भाजपाकडून ज्येष्ठ नेते नितीन गडकरी आपला उमेदवारी अर्ज उद्या दाखल करणार आहेत.

**तुळजापूर-मतदान**

महाराष्ट्रातल्या तुळजापूर इथल्या नगर परिषदेच्या प्राथमिक शाळेतील ४५ विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मतदान करण्यासाठी साद घालणारं पत्र लिहिलं आहे. या पत्रामध्ये त्यांनी लोकशाहीचं आणि मतदानाचं महत्त्व, आपली कर्तव्य याविषयी माहिती दिली आहे. पत्रलेखनासाठी मुख्याध्यापक गणेश रोचकरी आणि इतर शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन केलं. निवडणूक प्रक्रियेसंदर्भात जागृती निर्माण करण्यासाठी शाळेत निवडणूक गटाची स्थापनाही करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय महिला**

भाजपा उमेदवार कंगना राणावत यांच्यासंबंधी आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी काँग्रेसच्या सुप्रिया श्रीनेत यांच्याविरोधात राष्ट्रीय महिला आयोगानं निवडणूक आयुक्तांकडं तक्रार नोंदवली आहे. असभ्य आणि अपमानास्पद टिप्पणी करणाऱ्या सुप्रिया श्रीनेत आणि एचएस अहिर यांच्या वर्तनाची दखल घेऊन त्यांच्यावर त्वरित आणि कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा यांनी निवडणूक आयुक्तांना पत्र पाठवून केली आहे. दरम्यान, सुप्रिया श्रीनेत यांच्या आक्षेपार्ह मजकूरावर भाजपकडून तीव्र टीका करण्यात आली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सुप्रिया श्रीनेत यांच्यावर कठोर कारवाई करावी,असं भाजपच्या राष्ट्रीय माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे प्रभारी अमित मालवीय म्हणाले. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते, शेहजाद पूनावाला यांनीही ही घटना निंदनीय असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान काँग्रेसच्या समाज माध्यम आणि डिजिटल मंचांच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या सुप्रिया श्रीनेत यांनी कथित आक्षेपार्ह मजकूराबद्दल स्पष्टीकरण दिलं आहे. आपण

अशाप्रकारचा आक्षेपार्ह मजकूर कधीही प्रसारित करणार नाही, आपल्या समाजमाध्यमावरील खात्यावरून अन्य कोणीतरी हा मजकूर जारी केल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला.

**<u>रामजन्मभूमी मंदिर होळी</u>**

धूलिवंदन म्हणजेच रंगांचा सण काल देशभर उत्साहात साजरा करण्यात आला. मथुरेत काल द्वारकाधीश मंदिरात विविध रंगबेरंगी फुलांची उधळण करत हजारो भाविकांच्या उपस्थितीत रंगोत्सव साजरा करण्यात आला. अयोध्येतल्या श्रीराम मंदिरात, राम लल्लाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. राम मंदिरातही 'रंगोत्सव' उत्साहात साजरा झाल्याची माहिती श्री रामजन्मभूमी न्यासानं समाज माध्यमांवर दिली. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर पहिल्यांदाच अयोध्येत रामलल्लाला रंग अर्पण करून 'रंगभरी एकादशीला सुरुवात झाली. होळीनिमित्त राम मंदिरात दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने आले होते. यावेळी उत्सवाच्या रंगात एकमेकांना रंगवून, भाविकांनी भक्तीगीतं गायली.

**<u>उज्जैन आग</u>**

उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात लागलेल्या आगीच्या घटनेसंदर्भात चौकशीचे आदेश मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी काल दिले. या दुर्घटनेतील सर्व जखमींवर योग्य ते उपचार सरकारतर्फे केले जातील त्यांनी काल प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. राज्य सरकार प्रत्येक पीडिताला एक लाख रुपयांची आर्थिक मदत करणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. होळीच्या दिवशी श्री महांकालाला रंग अर्पण करण्याची परंपरा आहे. मात्र काल घडलेली घटना दुर्दैवी असल्याचं ते म्हणाले. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झाली नाही. सर्व जखमींची प्रकृती स्थिर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारच्या आपण संपर्कात असून, पंतप्रधानांनी या प्रकरणाची चौकशी करून भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याची काळजी घेण्यास सांगितलं असल्याचं यादव यांनी नमूद केलं. मंदिराच्या गर्भगृहात काल भस्मारतीच्या वेळी लागलेल्या या आगीत पुजाऱ्यांसह १४ जण जखमी झाले आहेत.

**<u>गाझा</u>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं गाझामध्ये तात्काळ युद्धबंदीचं आवाहन केलं आहे. ऑक्टोबरमध्ये युद्ध सुरू झाल्यापासूनच्या अनेक अयशस्वी प्रयत्नांनंतर परिषदेनं पहिल्यांदा युद्धबंदी बरोबरच सर्व ओलीसांची तात्काळ आणि बिनशर्त सुटका करण्याचं आवाहन केलं आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये यासंदर्भात झालेल्या प्रस्तावाच्या मतदानाच्या वेळी अमेरिका अनुपस्थित राहीली. अमेरिकेची ही भूमिका, गाझाच्या युद्धाच्या मुद्द्यावरून इस्राईलशी वाढत्या मतभेदाचे संकेत असल्याचं मानलं जात आहे. अमेरिकेनं आपली भूमिका बदलल्याचं इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या कार्यालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. नवीन ठरावाला अमेरिकेनं व्हेटो न दिल्यामुळे ओलिसांच्या सुटकेच्या प्रयत्नांना हानी पोहोचली असून ,हे अत्यंत खेदजनक असल्याचं या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. इस्रायली शिष्टमंडळ आणि वॉशिंग्टनमधले अमेरिकन अधिकारी यांच्यात या आठवड्यात होणाऱ्या बैठका रद्द करण्याचा निर्णय नेतन्याहू यांनी घेतला आहे. गाझामधील ओलिसांची सुटका जोपर्यंत होत नाही तोपर्यंत युद्ध थांबवणार नाही असं इस्राईलच्या संरक्षण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<u>अमरनाथ यात्रा</u>**

जम्मू काश्मीरमध्ये, वार्षिक अमरनाथ यात्रेच्या तयारीला सुरूवात झाली आहे. त्यासाठी यात्रेकरूंना आवश्यक परवानगी देणाऱ्या आरोग्य प्रमाणपत्रांची व्यवस्था जम्मू विभागातल्या दहा जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे. या क्षेत्रातल्या 112 डॉक्टरांना, आरोग्य केंद्रांमधून आरोग्य प्रमाणपत्रं देण्यासाठी नियुक्त करण्यात आलं आहे. अमरनाथ यात्रेची अधिकृत घोषणा अजूनही झालेली नसली तरी श्री अमरनाथ बोर्डाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत ही यात्रा २९ जून पासून सुरु करण्याचे संकेत देण्यात आले आहेत. येत्या काही दिवसात यात्रेकरुंच्या नोंदणीची तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे.

**<u>पाउस</u>**

अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्ये आज मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभाग नं व्यक्त केली आहे. नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, सिक्कीम, पश्चिम बंगालच्या हिमालयालगतच्या क्षेत्रात आणि गंगेच्या पठारी भागात आज हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<u>एपीसीसी</u>**

भारतात जुलै ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यवृष्टी अपेक्षित आहे, असा अंदाज आशिया प्रशांत आर्थिक सहकार्य हवामान केंद्रानं वर्तवला आहे. एप्रिल ते जून आणि जुलै ते सप्टेंबर असे दोन स्वतंत्र अंदाज एपीसीसीनं वर्तवले आहेत.

दरम्यान अल निनोमुळे या वर्षी तीव्र उष्णतेचा सामना करावा लागू शकतो अशी शक्यता भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी याआधी वर्तवली होती. मात्र, उन्हाळ्यानंतर अल निनो निष्क्रिय होण्याची शक्यता आहे. तसंच ला निनामुळे, मान्सूनच्या उत्तरार्धात भारतात चांगला पाऊस पडू शकतो असं एपीसीसीनं जारी केलेल्या नव्या अंदाजात म्हटलं आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं ,नमस्कार.**